घोषणा

दिनांक २४ एप्रिल ते २७ एप्रिल २०१८ या कालावधीत होणा-या महाराष्ट्र वित्त व लेखा परीक्षा वर्ग-३ एप्रिल २०१३ या विभागीय परीक्षेकरीता संचालनालय, लेखा व कोषागरे यांनी दिनांक ०३ एप्रिल २०१८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास पाठविलेल्या यादीतील १३७३ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला आहे.

याशिवाय, ज्या उमेदवारांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे मुळ अर्ज दाखल केले असून ज्या उमेदवारांना सदर परीक्षेस बसण्यासाठी मा. न्यायाधिकरणाचे आदेश प्राप्त झाले आहेत केवळ अशाच उमेदवारांना सदर परीक्षेकरीता प्रवेश देण्यात येईल.

अशा मा. न्यायाधिकरणाचे आदेश प्राप्त झालेल्या उमेदवारांनी परीक्षेकरीता **मा. न्यायाधिकरणाच्या आदेशाच्या प्रतिसह सैफ तैयबजी गर्ल्स हायस्कूल, भायखळा, मुंबई या उपकेंद्रावर परीक्षेच्या दिवशी सकाळी ०९.०० वाजता उपस्थित रहावे.**

सदर विभागीय परीक्षा एकुण चार उपकेंद्रावर घेण्यात येत असून उमेदवारांची उपकेंद्रनिहाय यादी आयोगाच्या संकेतस्थळावरील list of admitted candidates या सदराअंतर्गत प्रसिध्द करण्यात आली आहे.

दिनांक : २० एप्रिल २०१८

सु. सं. केसरकर
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
संचालनालय, लेखा व कोषागारे
मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊस, ठाकरसी हाऊस, ३ रा मजला,
जे. एन. हेरेडिया मार्ग, बेलार्ड इस्टेट,
मुंबई ४०० ०२१.

दुरध्वनी क्रमांक ०२२-२२६२२०२९ संकेतस्थळ - www.mahakosh.in
२२६२६२९१/२२६२६२३६ ईमेल आयडी aoexamdat.mum-mh@gov.in

क्र.संलेको/परीक्षा-१७/मविलेसे वर्ग-३ परीक्षा/सुचनापत्र/४-२०१८/१२२ दि. 21 APR 2018

सूचनापत्र

१) दि. २४ ते २७ एप्रिल-२०१८ या दरम्यान होणाऱ्या महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा वर्ग-३ (एप्रिल-२०१३) या विभागीय परीक्षेस बसण्याकरीता १३७३ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला आहे. सदर यादी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वेबसाईटवर (list of admitted candidates) या सदराअंतर्गत प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर परीक्षा ४ उपकेंद्रावर घेण्यात येणार आहे.

२) याशिवाय ज्या उमेदवारांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे मुळ अर्ज दाखल केले असून ज्या उमेदवारांना सदर परीक्षेस बसण्यासाठी मा. न्यायाधिकरणाचे आदेश प्राप्त झाले आहेत केवळ अशाच उमेदवारांना सदर परीक्षेकरीता प्रवेश देण्यात येईल, असे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दि. २०/०४/२०१८ रोजी घोषित केले आहे.

तरी मा. न्यायाधिकरणाचे आदेश प्राप्त झालेल्या उमेदवारांनी या परीक्षेकरीता मा. न्यायाधिकरणाच्या आदेश व परीक्षेचे प्रवेशपत्र, शासकीय कर्मचाऱ्याचे ओळखपत्र (कार्यालयाचे) घेऊन परीक्षेकरीता सैफ तैयबजी गर्ल्स हायस्कूल, भायखळा, मुंबई या उपकेंद्रावर परीक्षेच्या दिवशी सकाळी ९.०० वाजता उपस्थित राहावे.

३) त्याच प्रमाणे सर्व पात्र उमेदवारांनी परीक्षेच्या वेळापत्रकासोबत जोडलेल्या "विभागीय परीक्षा उमेदवारांना सूचना" मध्ये नमुद केल्याप्रमाणे सूचनांचे पालन करावे.

(वि.मा. शिंगटे)
उपसंचालक (प्रशिक्षण)
लेखा व कोषागारे, मुंबई.

सोबत :- दि. २०/०४/२०१८ चे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे घोषणापत्र.

Scanned by CamScanner